# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ६९ वा ❑ शनिवार दि.१९ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### दस्त नोंदणी झाली दुप्पट : नागरिकांचा आर्थिक ताण वाढणार

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

राज्य सरकारने नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागामार्फत आकारल्या जाणाऱ्या दस्त हाताळणी शुल्कात प्रति पान २० रुपयांवरून थेट ४० रुपये अशी दुप्पट वाढ करून नागरिकांवर आर्थिक भुर्दंड लावला आहे. आधीच जनता वेगवेगळ्या करांमुळे मेटाकुटीस आली असताना आता परत दस्त नोंदणी दुप्पट करून महागाईच्या काळात सर्वसामान्य जनतेचे कंबरडे राज्य शासनाने मोडून काढले आहे. या निर्णयामुळे नागरिकांना जमीन, घर किंवा व्यावसायिक मालमत्तेची नोंदणी करताना जास्त खर्च करावा लागणार आहे. हा निर्णय शासनाच्या वाढत्या खर्चासाठी आणि सरकारी महसुलासाठी घेण्यात आला आहे, असे सांगण्यात येत आहे.

घर, दुकान किंवा इतर मालमत्तेची खरेदी किंवा विक्री करताना नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क तसेच कागदपत्रांसाठी हाताळणी शुल्क असे तीन प्रकारचे शुल्क आकारले जाते. त्यापैकी नोंदणी शुल्कात वाढ करण्यात आलेली नाही. तर, मुद्रांक शुल्कदेखील सरकारने वाढवलेले नाही. हे शुल्क करारात नमूद व्यवहाराच्या रकमेवर अवलंबून असते. परंतु, सरकारनं आता कागदपत्र हाताळणी शुल्क थेट दुप्पट केले आहे. त्यामुळं १०० पानांच्या करारासाठी ४ हजार रुपये जास्त भरावे लागणार आहेत.

महत्त्वाचे म्हणजे, हे पैसे सरकारी तिजोरीत जमा होणार नसून ते नोंदणी प्रक्रिया करणाऱ्या सॉफ्टवेअर कंपनीकडे जमा होतील. राज्यात २००१ नंतर दुय्यम निबंधकांच्या कार्यालयांच्या संख्येत सुमारे २०० ने वाढ झाली आहे. या कार्यालयांमध्ये संगणकीकरणाचा खर्चही वाढला आहे. त्यामुळं कागदपत्रांच्या हाताळणीचा खर्च वाढवण्यात आला आहे.

**२००१ पासून सुरू आहे संगणीकृत प्रणालीचा वापर :**

राज्यात २००२ पासून बांधा, वापरा व हस्तांतरण करा या तत्त्वावर नोंदणी व मुद्रांक विभागास खासगीकरणाच्या माध्यमातून संगणकीकरण करणे तसेच त्यासाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी एका पानासाठी २० रुपये असे शुल्क निश्चित करण्यात आले होते. सध्या नोंदणी व मुद्रांक विभागाच्या विविध कामांसाठी राज्यात ३५ यंत्रणा कार्यरत आहेत. या यंत्रणांसाठी सॉफ्टवेअर विकसित करणे, अपडेट करणे तसेच देखभालीसाठी लागणाऱ्या खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. २०१२ मध्ये नोंदणी विभागाने वेब आधारित यंत्रणा कार्यान्वित केली. त्यासाठी डेटा सेंटर व सर्व्हरसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधेची गरज होती. यामुळे खर्चात आणखी वाढ झाली होती.

राज्यात दरमहा सुमारे साडेतीन लाख दस्तांची नोंदणी होते, ज्यामुळे सरकारला सव्वाचार हजार कोटी रुपये महसूल मिळतो. शुल्कवाढीमुळे हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे, परंतु याची अचूक आकडेवारी देण्यास अधिकारी तयार नाहीत. ही वाढ नागरिकांसाठी आर्थिक ताण वाढवणारी ठरत आहे, विशेषतः जे छोट्या प्रमाणात मालमत्ता खरेदी-विक्री करतात त्यांच्यासाठी हा मोठा झटका आहे.

# चापेकर वाड्यातील राष्ट्रीय संग्रहालयाचे लोकार्पण

### बलिदानातून स्वातंत्र्यलढ्याला कलाटणी, चापेकरांच्या बलिदानानंतर देशात क्रांतिकारकांची फळी

**ज्योतिर्मय सराहित्य**

**पिंपरी चिंचवड –** रँडच्या वधानंतर फाशीवर जाताना चापेकर बंधुंना क्षणभरही पश्चाताप अथवा भिती वाटली नाही. त्यांच्या बलिदानातून देशात क्रांतिकारकांची मोठी फळी उभी राहिली. दुर्दैवाने आपल्याला आज बोटावर मोजण्याइतकेच क्रांतिकारक परिचित आहे, अशी खंत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. देशाच्या स्वातंत्र्यात क्रांतिकारकांच्या बलिदानाचा मोठा वाटा आहे. पंतप्रधानांच्या प्रयत्नांतून अपरिचीत अशा साडे बाराहजार क्रांतिकारकांची गाथा देशासमोर येत असल्याचेही ते म्हणाले.

क्रांतिवीर चापेकर बंधुंच्या वाड्यातील संग्रहालयाचे लोकार्पण आणि राष्ट्रीय संग्रहालयाच्या दुसऱ्या टप्प्याच्या भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री जयकुमार रावळ, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, आमदार प्रशांत बंब, माजी खासदार अमर साबळे, माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे, क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष गिरीश प्रभुणे, महापालिका आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते. चापेकर वाडा येथील राष्ट्रीय संग्रहालय आणि पुनरुत्थान समरसता गुरुकुलमला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी भेट दिली. त्यानंतर प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात हा कार्यक्रम पार पडला.

''चापेकर बंधुंनी क्रांतिकार्याबरोबरच समाजसुधारणांचेही कार्य केल्याचे गौरवपुर्ण उद्गार मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढले. ते म्हणाले, ''स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या क्रांतिकारकांचा इतिहास पुढच्या पिढीपर्यंत पोहचायला हवा. त्यासाठी चापेकर स्मारकाला विद्यार्थ्यांच्या भेटी आयोजित केल्या तर संस्कार होतील.'' चापेकर बंधुंचे स्मारक हे अप्रतिम आणि प्रेरणा देणारे असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. ते म्हणाले, ''चापेकर बंधुंनी केलेला रँडचा वध हा जनजागृतीची ठिणगी आणि देशाभिमानाचा हुंकार होता. अशा स्वातंत्र्यवीरांच्या त्याग, बलिदान आणि समर्पणातूनच देश घडला आहे. त्यातूनच देशाची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्व कायम आहे.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक गिरीश प्रभुणे यांनी केले. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संदेश पाठवून चापेकरांना श्रद्धांजली अर्पण केली.

**समरसता गुरूकुलम सामाजिक उत्थानाचे केंद्र**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुनरुत्थान समरसता गुरुकुलमला भेट दिली. वंचित समाजातील विशेषतः पारधी समाजातील विद्यार्थ्यांची निवासी शाळा असलेल्या या गुरूकुलातील विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. पारंपारिक कौशल्यांबरोबरच विद्यार्थी आधुनिक कौशल्य आणि कला आत्मसात करत आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ''वंचित समाजाला पायावर उभे करणारा आदर्श आणि उत्तम नमुना म्हणजे हे गुरुकुलम् आहे.''

**असे आहे चापेकरांचे स्मारक :**

दामोदर, बाळकृष्ण आणि वासुदेव चापेकर यांच्या पुर्वजांचे घर असलेल्या ठिकाणी हे राष्ट्रीय संग्रहालय उभे आहे. ज्यामध्ये चापेकर बंधुंचा संघर्ष आणि स्वातंत्र्यातील बलिदानाचे १३ भावस्पर्शी प्रसंगांचे सादरीकरण आहे. गुप्त बैठका, इंग्रजांच्या विरोधातील कट आणि जनतेसमोर केलेल्या क्रांतिकारक भाषणांचे क्षणही यात उभे करण्यात आले आहे. दृकश्राव्य ॲनिमेशनाचाही यात वापर करण्यात आला आहे. ज्याचे लोकार्पण आज झाले. तसेच चापेकर वाड्याच्या मागेच राष्ट्रीय संग्रहालयाचे कोनशिलेचे अनावरणही करण्यात आले. ज्यात पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून राष्ट्रीय संग्रहालय उभारण्यात येणार आहे. ज्यामध्ये भारताच्या प्राचिन काळापासूनचा सांस्कृतिक विकास आणि समाजाचे पुनरूत्थान मांडण्यात येणार आहे. ज्यात विज्ञान, कला, कौशल्य, इतिहास, पुरावे, पुरातत्वीय अवशेष, खगोलीय बदल आदींचा समावेश असेल. त्रिमितीय मॉडेल्स, एआर, प्रोजेक्शन स्क्रिन, दडगी भित्तीचित्रे यात असतील. महाराष्ट्र दिनापासून हे स्मारक सर्वांसाठी खुले होईल. यावेळी स्मारक समितीचे कार्यवाह ॲड. सतीश गोरडे, प्रांत संघचालक प्रा. नाना जाधव, जिल्हा संघचालक विनोद बन्सल, विश्वस्त मिलिंद देशपांडे, विश्वस्त आणि संघाचे पुणे विभाग कार्यवाह मुकुंद कुलकर्णी आदी उपस्थित होते.




# सुंदरकांडाच्या वाचनाने सकारात्मक ऊर्जा मिळते – रसराज महाराज

**ज्योतिर्मय सराहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** रामायणातील आठवा अध्याय म्हणजे सुंदरकांड आहे. हनुमान नायक असलेल्या असलेल्या या अध्यायाच्या वाचनाने सकारात्मक उर्जा प्राप्त होते. तसेच मनुष्य सकारात्मक उर्जेने भरुन जातो, त्याला यश मिळते. इच्छापूर्ती व्हावी, जीवनात सुख आणि समृद्धी राहावी. जीवन प्रेरणादायी व उत्साही असावे, याकरिता सुंदरकांडाचा पाठ प्रत्येकाने करण्याचे आवाहन सुंदरकांड कथाकार रसराज महाराज यांनी केले. पानदरिबा येथील जागृत हनुमान मंदिर ट्रस्टच्या वतीने आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी कथेने भाविक मंत्रमुग्ध पहायला मिळाले.

सुंदरकांडाच्या या अध्यायात ६८ उपखंड आणि २८६४ श्लोक आहेत. हनुमंतांनी रामायणादरम्यान केलेली प्रवासवर्णने आणि यशोगाथा नमूद केलेल्या आहेत. वाल्मीकींनी लिहलेले सुंदरकांड हनुमानाच्या अष्टगुणांचे वर्णन करणारे आहे. हनुमानाचे साहस अन भक्ती यांचे तपशीलवार वर्णन आहे. त्यामुळे सर्वांनी सुंदरकांडाचे वाचन करुन जीनव समृद्ध करण्याचे आवाहन रसराज महाराज यांनी केले. जागृत ट्रस्टचे अध्यक्ष, उद्योजक सतीष व्यास यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या सोहळ्यात माजी नगरसेवक राजेश उर्फ पप्पू व्यास, दीपक व्यास, युवासेनेचे मिथून व्यास, गौरव व्यास, आदींसह व्यास परिवार, मित्रमंडळी, केतन साहुजी, रोहीत आहुजा आदी उपस्थित होते.




# ''कवितेचं गोत्र हरवलंय'' मैफिलीचा तिसरा प्रयोग उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई –** महाराष्ट्राच्या विविध भागांतील नवोदित कवी कवयित्रींना एक उत्कृष्ट प्रायोगिक मंच मिळवून देण्याच्या उद्देशाने कवी अनुकूल माळी यांच्या संकल्पनेतून, कवी प्रदीप बडदे यांच्या मार्मिक नियोजनातून तसेच कवयित्री कल्पना देशमुखांच्या मार्गदर्शनाखाली कवितेचा पार उभारला गेला. दि.१४ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी सेंट्रल पार्क, घणसोली, नवी मुंबई येथे ''कवितेच्या पारावर'' या नव्या कोऱ्या मैफिलीचा तिसरा प्रयोग उत्साहात पार पडला.

हरवलेल्या रसिकांचा शोध घेत मनाला मनापासून साद घालत ठाणे, दिवा, कल्याण, कोपरखैरणे, पनवेल, सानपाडा, नेरूळ, वाशी, घणसोली अशा नवी मुंबई व ठाणे जिल्ह्यातील साहित्यिकांनी आपली प्रार्थनीय उपस्थिती दर्शविली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त व ताराराणी भोसले यांच्या खंबीर लढ्याचा ठाव घेत गीतं आणि कविता वेगवेगळ्या संकल्पनेतून सादर केल्या गेल्या. पारावर जमलेल्या प्रत्येक कवीने स्वर व शब्दांच्या साथीने आपल्या कवितेत प्राण ओतला व रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. समाजभान, वास्तवभान त्याबरोबरच बोलगाणी, गीतगायन, भारूड व गझल अशाप्रकारे कवींनी विविध अंगाने सादरीकरण केले.



या मैफिलीत अनिल सोनवणे, कल्पनाताई देशमुख, रश्मी राऊत, डॉ. सुमेध वैद्य, काजल आठवले, श्वेता मांदडकर, स्वाती भोसले, महेश भोसले, काव्या भोसले, हर्षल देशमुख, राधा गानू मॅडम, नारायण लांडगे, नेत्रा, सुनेत्रा, मंगलामाई या कवी कवयित्री तसेच कलाकारांनी सहभाग घेऊन आपल्या कवितांचे उत्तम सादरीकरण केले.

अशा या रंगतदार मैफिलीला अध्यक्षा म्हणून शास्त्रीय गायीका राधा गानू या लाभल्या होत्या. साहित्यातील प्रवास व सामाजिक बांधिलकी जपण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेले मार्गदर्शन प्रबोधनपूर्वक ठरले. द.भा. धामणस्कर यांच्या सहवासातील स्वातंत्र्यपूर्व काळात घडलेले काही किस्से त्यांनी सांगितले. मैफिलीत शारदा स्तवन सादर करून गानू माईनी अनोखी शोभा आणली व मान्यवरांचा उत्साह द्विगुणित केला. मैफिलीला मार्गदर्शिका कल्पनाताई देशमुख यांच्या कन्या प्रतिक्षा देशमुख या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. संशोधन क्षेत्रातील कार्याचा प्रवास आणि अनुभव मांडत असताना एक कणखर व बाणेदार असे तरूण नेतृत्व प्रतिक्षाच्या व्यक्तीमत्त्वाबाबत सहजपणे येथे टिपण्यात आले. या मैफिलीची संकल्पना आखून कवी/ पत्रकार प्रदीप बडदे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सूत्रसंचालन केले तसेच सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. कवितेच्या पारावर जमलेल्या सर्व साहित्यिक कलाकारांनी नवी विचारप्रणाली मांडून एकमेकांचा निरोप घेतला.







– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## अध्यात्म हे अंतर्गत शक्तीचा स्त्रोत


ज्योतिर्मय साहित्य

सध्याची परिस्थिती,त्या परिस्थितील सर्व सामान्य मनुष्य, त्यांच्या अडीअडचणी, त्या अडचणींच्या निवारणार्थ शोधात असलेल्यांची मानसिकता ह्या विषयांचा सविस्तर खुलासा करून घेणे अधिक आवश्यक आहे. ह्या गुरुतत्वात सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करण्याची योग्य दिशा प्राप्त होत असते. ज्यायोगे सर्वत्र सकारात्मक वातावरणाची निर्मिती होत राहते. अध्यात्म तीन पैलूंनी बनलेले आहे; नातेसंबंध, मूल्ये आणि जीवनाचा उद्देश हे होत. अध्यात्मात भावना, संवेदना किंवा असा विश्वास आहे की, माझ्यापेक्षा काहीतरी मोठे आहे, संवेदनात्मक अनुभवापेक्षा मानव असण्यापेक्षा काहीतरी अधिक आहे आणि ज्याचा आपण भाग आहोत.त्यामागचे कारण, तो वैश्विक किंवा दैवी निसर्ग हे आहे. अध्यात्म आपल्या चांगल्या भविष्यासाठी आपला दृष्टीकोन मजबूत करते. जीवनात आपल्याला नेहमीच आव्हानांचा सामना करावा लागतो, परंतु त्या कठीण काळात आपण आशावादी राहिलो तर आपण निश्चितच सक्षम होऊ शकतो.

आपण प्रत्येकाने आपल्या आध्यात्मिक गरजा समजून घेतल्या पाहिजेत. आध्यात्म हा मानसिक आणि शारीरिक उपचारांचा अविभाज्य घटक आहे. अध्यात्म संकट समयी अंतर्गत शक्तीचा स्त्रोत असल्याचे आपण जाणून घेतले पाहिजे. ते आपल्या कल्याणाच्या केंद्रस्थानी असून आपल्या जीवनातील सर्व पैलूना समृद्ध करते. शारीरिक, मानसिक, भावनिक आणि नातेसंबंध दृढ करण्यास उपयुक्त ठरते. आपल्या कौटुंबिक गरजांसाठी व्यावहारिक, समजूतदार आणि शांत दृष्टिकोनाला प्रोत्साहन देते. आपल्या अंतःप्रेरणेवर आत्मविश्वास देते आणि यशाकडे जाण्यासाठी आवश्यक ती शक्ती प्रदान करते. आध्यात्मिक तंदुरुस्ती, उद्देश निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाची पायरी म्हणजे स्व-मूल्यांकन करणे होय. आपल्या जीवनाचे सात परिमाण समृद्ध करण्यासाठी वैयक्तिक योजना करण्याची गरज असते. आपले मन, शरीर, आत्मा, प्रेम, कार्य, खेळ, जग ह्याचा त्याच्याशी थेट संबंध असतो.


## अनोखे अंदमान

ज्योतिर्मय साहित्य




स्वातंत्र्यवीर सावरकरांची कोठडी पाहून आल्यानंतर खाली एका हॉलमध्ये सेल्युलर जेलचे मॉडेल आपल्याला बघायला मिळते. पूर्वी या ठिकाणी सात इमारती होत्या. आता त्यातील तीनच शिल्लक आहेत.

एखाद्या विशाल चक्राभोवती सात आरे असावेत अशा येथील या सात इमारती आहेत आणि मध्यभागी त्या सात इमारतींना जोडणारी आणि त्या सातही इमारतींवर एकाच ठिकाणाहून लक्ष ठेवता येईल अशी मध्यवर्ती इमारत किंवा टॉवर. सेल्युलर जेल म्हणजे सेल्युलर जेल मधील या कोठड्यांच्या रचनेचा उद्देश होता पूर्ण एकाकीपणा. कैद्याला ना संवाद, ना सोबत, ना आधार. ही केवळ शारीरिक शिक्षा नव्हे, तर मानसिक छळ होता. आणि त्या कोठडीतून दुसऱ्या कोणत्याही कैद्याला पाहता येणार नाही.





आता येथे असलेल्या तीन इमारतींपैकी पहिल्या इमारतीतील स्वातंत्र्यवीर सावरकर यांना ज्या ठिकाणी ठेवले होते तीच कोठडी आपल्याला पाहता येते. अन्य कोठड्या बंद आहेत परंतु गजांच्या दारातून त्या पाहता येतात. या कोठड्या आज मूक असल्या तरी एकेकाळी क्रांतिकारकांच्या झालेल्या छळाच्या त्या साक्षीदार आहेत.सेल्युलर जेल मधील या कोठड्यांच्या रचनेचा उद्देश होता पूर्ण एकाकीपणा. कैद्याला ना संवाद, ना सोबत, ना आधार. ही केवळ शारीरिक शिक्षा नव्हे, तर मानसिक छळ होता.

इथे असलेल्या अन्य दोन इमारती पाहता येत नाहीत. त्यापैकी एका इमारतीत एक हॉस्पिटल सुरू असल्याचे सांगण्यात येते.

स्वा. सावरकरांची कोठडी पाहिल्यानंतर खाली समोरच्या बाजूला दिसतो ते फाशी घर मृत्यूचं प्रवेशद्वार. या वास्तूचा सर्वात अस्वस्थ करणारा भाग म्हणजे फाशी घर. तुरुंगाच्या एका बाजूला असलेली ही जागा अतिशय साधी पण भयानक आहे. एक लाकडी चौथरा, तीन दोरखंड एकाच वेळी तिघांना फाशी देता यावी अशी रचना. परत परत फाशी देण्याचा त्रास नको म्हणून एकाच वेळेला तीन कैद्यांना फाशी द्यायचं आणि त्यांना पुरण्यातील येत असे ते तीन खड्डे देखील तेथील कैद्यांकडूनच खणून घेतले जायचे. तिथे उभं राहून फक्त एकच विचार मनात आला किती सहजपणे इथे माणसांचे प्राण घेतले गेले असतील ! इथे जीवन दुर्मिळ होते आणि मृत्यू स्वस्त !

त्या दोरखंडांकडे पाहताना शरीर थरथरतं, आणि डोळे आपोआप ओलावतात. इतिहासातल्या त्या ओळी आठवतात ''काही माणसं मरून जगतात, काही जिवंत राहून मरतात.'' इथले कैदी मात्र मृत्यू स्वीकारून अमर झाले. स्वा. सावरकरांना समोरच दिसेल अशा पद्धतीची ही सगळी व्यवस्था होती असे म्हणतात की ज्यावेळी इतर कैद्यांना फाशी देण्यात येत असे, त्यावेळी सावरकरांना मुद्दाम कोठडी बाहेर आणून त्या घटनेचे साक्षीदार करण्यात येई. उद्देश हा असायचा की ते सगळे पाहून त्यांचे मनोधैर्य खच्ची व्हावे. परंतु मातृभूमीसाठी अवघं आयुष्य समर्पित करणाऱ्या या नरसिंहाचा निश्चय पक्का होता. मातृभूमीच्या चरणी समर्पित होण्यासाठीच हे फुल उमललं होतं. ही भयंकर वास्तू, या पोलादी गज असलेल्या कोठड्या, कैद्यांना दिल्या जाणाऱ्या यातना त्यांचे मनोधैर्य खच्ची करू शकल्या नाहीत.

( क्रमशः)




दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## स्वगुण परीक्षा


ज्योतिर्मय साहित्य

विषय शब्दाचा अर्थ पाहू गेल्यास''विशेषेण सिंचन्ति इंद्रियाणि मनश्च'' ज्याच्या ठिकाणी इंद्रिये व मन बुडून जातात मग्न होतात म्हणजे इंद्रीयभोग अर्थात देहातून सुख घेण्याची आवड. कधीही समाधान न होणाऱ्या आशेच्या साखळीने माणुस बांधलेला असतो. भगवंताचा विसर पडणे म्हणजे वाईट काळ समजावा. आत्मबुध्दी विसरून देहबुद्धी त जाण म्हणजे स्वर्गातुन नरकात पडण्या सारखे आहे. समर्थानी दहाव्या ओवी पासुन अठराव्या ओवी पर्यतचा प्रवास म्हणजे शरिराच्या जन्माची क्रीया ते समजून घेत असताना आपल्याला आपल्याच शरीराची किळस येते. शरीर वरवर कितीही चांगले वाटलेतरी त्यात डोकावून पहाता ते किती घाणीचै साम्राज्य आहे. हे वरील ओव्या वाचताना खात्री पटते. घाणीने भरलेले हे शरीर कितीही निर्मळ करायचा प्रयत्न केला तरी ते स्वच्छ होत नाही. समर्थींनी डोकं या अवयवाला मात्र ऊत्तमांग म्हणलं आहे. मल मुत्र ओक हे जर शरिराचे झाले नाही तर मनुष्य लवकरच मरेल. **क्रमशः**

अठ्ठावीस ओव्याच्या पुढे तर आईच्या गर्भात जीवाचे कसे हाल होतात याचे वर्मन केले आहे. आईच्या गर्भात असताना मुल सोह,सोहम् असं म्हणते मी तो आहे मी ईश्वर आहे. आणि बाहेर पडल्यावर ते ''कोहं कोहं '' म्हणू लागते.जीवाला देहबुद्धी येते. व स्वस्वरूपाची जाणीव मावळू १ या लागते. देह विकार विकसीत होऊ लागला की सुखदुःखाचे हेलकावे बसु लागतात. यातुन सुटण्याचा ऐकचं मार्ग तो म्हणजे ''भगवंताला शरण जाणे''

सन्माननीय वाचक मंडळी तुमच्या सगळ्यांच्या प्रोत्साहननाने व समर्थाच्या आशिर्वादाने आज तिसरा दशक तुमच्या हाती देताना खुपच आनंद होत आहे गेल्या दोन महिन्यांत माझ्याच शरिराच्या काही भागाने असहकार पुकारल्यामुळे मी तुमच्या समोर व्यक्त होऊ शकले नाही. त्याबद्दल क्षमस्व

## संत हे चालते-बोलते देवच आहेत.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

व्यवहारात ज्याला चांगले वागता येत नाही, त्याला नाही परमार्थ करता येणार. व्यवहारात झालेल्या गोष्टींचा मनावर परिणाम होऊ देणार नाही असा निश्चय करावा, आणि सद्गुरूआज्ञा प्रमाण मानून तो तडीस न्यावा. साधनावर जोर द्यावा. स्वत: कोण याची ओळख करून घ्यावी. भगवंतापरते कोणी नाही हे कळले म्हणजे मी कोण हे कळते. निर्गुण जरी समजले तरी सगुण नाही सोडू. माझ्या मुखी राम आला यापरते दुसरे भाग्य ते कोणते ? हृदयात स्फूर्ती येऊनच आपण बोलतो; मग आमच्या मुखात राम आला तर तो हृदयात नाही असे कसे म्हणावे ?

तुम्ही मला उपनिषदांतले सांगा म्हटले तर कसे सांगू ? ज्याने जे केले तेच तो सांगणार. एक – गुरुआज्ञापालन याशिवाय दुसरे काहीच मी केले नाही, तर मी दुसरे काय सांगणार ? संताचा समागम केला म्हणजे आपण मार्गाला लागतो. आपण साधूला व्यवहारात आणतो, आणि नंतर तो आपल्याशी व्यवहाराने वागला म्हणजे त्याच्याजवळ समता नाही म्हणून उलट ओरड करतो! संत हे देहाचे रोग बरे करीत नसून, त्या रोगांची भीती नाहीशी करतात. संत हे चालते-बोलते देवच आहेत. संतांच्या देहाच्या हालचालींना महत्त्व नाही. भगवंताचे नाम सिद्ध करून देणे हाच संतांचा जगावर सर्वांत मोठा उपकार होय. हजारो लोक भगवंताच्या नामाला लावणे हेच खरे संतांचे कार्य होय. संतांचा कोणताही मार्ग हा वेदांच्या आणि शास्त्राच्या उलट असणे शक्यच नाही. संत सूर्यासारखे जगावर स्वाभाविक उपकार करतात. सूर्याचे तेज कमी होते आहे असे शास्त्रज्ञ म्हणतात, पण संतांचे तेज मात्र वाढतेच आहे. श्रीमंत आईबापांच्या पोटी जन्माला आलेला मुलगा भीक मागताना पाहून आपल्याला त्याची कीव येते, त्याप्रमाणे मनुष्यजन्माला येऊन आपण दुःख करतो हे पाहून संतांना वाईट वाटते. एकूण योनी इतक्या आहेत की, त्यांमध्ये मनुष्यजन्म येणे कठीण आहे. मनुष्यजन्म येऊन भगवंताची प्राप्ती झाली नाही तर जीवाचे फार नुकसान आहे. म्हणून अत्यंत चिकाटीने संतांचा समागम करावा, त्यांची कृपा प्राप्त करून घ्यावी. संतांनी जो मार्ग आखला त्यावर डोळे मिटून जावे; पडण्याची, अडखळण्याची भीतीच नाही. आपण प्रपंचात इतके खोल जातो, की संतांची हाक ऐकूच येत नाही. ती ऐकू येईल इतक्या तरी अंतरावर असावे. संतवचनावर विश्वास ठेवूया, म्हणजे भगवत्प्रेम लागेलच. ते लागल्यावर विषयप्रेम कमी होईल. म्हणून संतांची संगत करणे एवढे जरी केले तरी कल्याणच होईल. संत-संगती आणि नामस्मरण यानेच भगवत्प्रेम येईल.

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## गोष्टी प्राण्यांच्या १०

ज्योतिर्मय साहित्य

आपण निसर्गाकडे थोडे लक्ष दिले तर असे समजते, आपण लहानपणी पासून खूप विविध प्रकारचे जीवजंतू बघतो. आणि ते आपल्या अवती भोवती वावरत असतात. काही तर कशासाठी या जगात आहेत असा प्रश्न उपस्थित होतो.

आमच्या लहानपणी दिवाळी, मे महिना या सुट्ट्या म्हणजे नातेवाईकांच्याकडे जाण्याच्या असायच्या. मावशी, मामा, आत्या, काकू यांच्याशी आधीच पत्राद्वारे कोणी कधी कोणाकडे जायचे हे ठरवले जात होते. आणि साधा टेलिफोन नसताना सुद्धा सगळे व्यवस्थित एकत्र मिळून ठरलेल्या गावी जात होतो.

आणि त्यावेळी खूप सिमेंटची जंगले नव्हती. सगळ्यांचा मातीशी संपर्क होता. असेच एकदा मावशीच्या घरी सगळी भावंडे जमली होती. आणि सगळे एकाच हॉलमध्ये झोपलो होतो. थोड्या वेळाने इतर भावंडे जागी झाली. सगळ्यात शेवटी मला उठवले. काय झाले म्हणून विचारले त्यावेळी सर्वांनी आपले कपडे व अंथरुण दाखवले तर त्यावर अनेक काळे, चॉकलेटी डाग हलताना दिसले. नीट बघितले तर ते ढेकूण होते. ते बघून एका बहिणीने सांगितले, आपण एका भांड्यात पाणी घेऊन त्यात ते वेचून टाकू. मग सगळी भावंडे कामाला लागली. मी मात्र शोध लावत होते, हे इतके अचानक कोठून आले? आणि त्यांचे निरीक्षण करत बसले. सगळ्या भावंडांच्या हातातून वाचून त्यातील काही जीव आपला जीव मुठीत धरून सरसर लाकडी खांबावर चढत होते. आणि ते बघून त्यांचे निवासस्थान आम्हाला सापडले. दुसऱ्या दिवशी सगळ्यांचा बंदोबस्त आमच्या काकांनी करुन टाकला.

दुसऱ्या मावशीकडे गेलो तर तिथे खूप पाली बघितल्या. त्या आरामात स्वतःचे घर असल्या प्रमाणे घरात ये जा करत होत्या. आणि आम्हाला त्यांची भीती वाटत होती. मावशी म्हणायची त्या तुम्हाला काही करणार नाहीत. त्या त्यांचे खाद्य घ्यायला येतात. तिचे घर शेतात होते. म्हणजे आता त्याला फार्म हाऊस म्हणतात. त्या घरात लाईट भोवती शेतातील किडे यायचे आणि ते खायला पाली यायच्या. आणि निघून जायच्या. तिच्याच घरी एक मांजर होती. ती पालीवर झडप घालून त्यांना पकडून तोंडात घेऊन जायची. आणि बाहेर जाऊन खाऊन टाकायची.

त्याच मावशीकडे रोज सकाळी पोपटांचा थवा यायचा. आणि घरासमोर उतरुन समोरच्या गावतातील किडे, धान्य, जांभळे, पेरू उष्टे करून जायचे. ते गेले की आम्ही त्या पेरु आणि जांभळांवर तुटून पडत होतो. दुपारी शेतात फिरताना खूप टोळ दिसायचे. आणि आम्ही त्यांच्या शेपटीला दोरा बांधून त्यांची हेलिकॉप्टर उडवत होतो. झोपताना प्रत्येकाला सावध झोपा. सांगितले जायचे. कारण बाहेर अंगणात झोपताना मजा वाटायची. पण कोण ( किडे, विंचू ) आपल्या अंथरुणात येईल याची खात्री नसायची. एकदा तर माझ्याच उशीखाली साप जाऊन बसला होता. मला समजले नाही. पण त्याच मावशीच्या मुलीच्या लक्षात आले. तिने आपल्या आईला हळूच उठवले. आणि ''विभाच्या उशीखाली तो बसला आहे'' असे सांगितले. तिनेच सगळ्यांना न उठवता हळूहळू उचलून दुसरीकडे झोपवले. आणि शेवटी मला उठवले. मावशी तयार होतीच. मी बाजूला झाल्यावर तिने पटकन उशी बाजूला केली. आणि हातातील बत्ता ( पूर्वी चटणी कुटणे, दाण्याचा कूट करणे या साठी खल आणि बत्ता वापरत असत ) त्याच्या बरोबर तोंडावर मारला. ती काहीही गोंधळ, आवाज न करता बसून त्या बत्त्याने साप मारायची.

आम्ही प्राथमिक शाळेत असताना, माझी एक मैत्रीण शेतातील किंवा गवताळ जमिनीवर जी पाण्याने भरलेली बिळे असतात त्यात खेकडे असतात. ती चालणारा खेकडा किंवा त्या त्यांच्या बिळात हात घालून खेकडे बाहेर काढायची आणि त्यांच्या नांग्या मोडून सोडून द्यायची.

असे विविध प्राणी, कीटक, पक्षी यांच्या समवेत आमचे बालपण आनंदात गेले. त्यातील प्राणी अजूनही दर्शन देऊन आठवण करून देतात.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

करे श्लाघ्यस्त्यागः शिरसि गुरूपादप्रणयिता
मुखे सत्या वाणी विजयि भुजयोर्वीर्यमतुलम् ।
हृदि स्वच्छा वृत्तिः श्रुतमधिगतं च श्रवणयो-
र्विनाऽप्यैश्वर्येण प्रकृतिमहतां मण्डनमिदम् ।।

अर्थ – सज्जनांचे हात स्तुत्य अशा त्यागाने अलंकृत होतात. त्यांचे मस्तक गुरुजनांना केलेल्या प्रणामाने अलंकृत होते. त्यांचे मुख सत्यवचनाने अलंकृत होते. त्यांचे बाहू विजयी तथा अद्वितीय पराक्रमाने अलंकृत होतात. त्यांचे हृदय विशुद्ध वृत्तीने अलंकृत होते. त्यांचे कान शास्त्रश्रवणाने अलंकृत होतात. सज्जनांना हे अलंकार भौतिक ऐश्वर्याषिवाय प्राप्त होतात. अर्थात ही त्यांची स्वभावसिद्ध आभूषणे आहेत. त्याग, विनम्रता, सत्यवचन, पराक्रम, विशुद्ध वृत्ती, शास्त्रश्रवण यांमुळे सज्जन अलंकृत होतात. ही अलंकरणं सज्जन प्रयासाने प्राप्त करीत नाहीत, तर ती त्यांची स्वभावसिद्ध वैशिष्ट्ये असतात. किंबहुना या स्वभावसिद्ध वैशिष्ट्यांमुळेच तर ते 'सज्जन' या संज्ञेला प्राप्त होतात.




## उन्हाळ्यात कोणती कपडे घालवित

ज्योतिर्मय साहित्य

उन्हाळ्यात आरामदायक आणि थंड राहण्यासाठी योग्य कपड्यांची निवड करणे महत्त्वाचे आहे. येथे काही पर्याय दिले आहेत:

– सुती कपडे:

उन्हाळ्यात सुती कपडे घालणे हा सर्वोत्तम पर्याय आहे. ते घाम शोषून घेतात आणि शरीराला हवा खेळती ठेवतात.

– हलक्या रंगाचे कपडे पांढरा, फिकट निळा, पिवळा आणि इतर हलके रंग उष्णता कमी शोषून घेतात आणि तुम्हाला थंड ठेवतात.

– सैल कपडे:

घट्ट कपड्यांऐवजी सैल कपडे घाला, ज्यामुळे शरीराला हवा खेळती राहते.

– लिननचे कपडे:

लिनन हे एक नैसर्गिक फायबर आहे जे हलके आणि हवा खेळते ठेवण्यास मदत करते.

– हलके डेनिम:

जाड डेनिमऐवजी हलके डेनिमचे कपडे निवडा.

– या व्यतिरिक्त, तुम्ही खालील गोष्टी लक्षात ठेवू शकता:

टोपी आणि सनग्लासेस: टोपी आणि सनग्लासेस उन्हाळ्यात सूर्यप्रकाशापासून संरक्षण करण्यासाठी उपयुक्त आहेत.

हलके शूज:

बंद शूजऐवजी सँडल किंवा इतर हलके शूज घाला.

नैसर्गिक फायबर:

कृत्रिम फायबरऐवजी नैसर्गिक फायबरचे कपडे निवडा, कारण ते अधिक आरामदायक असतात.

कपड्यांची निवड:

– उन्हाळ्यात प्रवास करत असाल तर, आरामदायी कपड्यांना प्राधान्य द्या.

– ऑफिससाठी कपडे निवडताना, हलक्या रंगाचे आणि सैल कपडे निवडा.

– घरात असताना, सुती किंवा लिननचे सैल कपडे घाला.

कपड्यांची काळजी:

– उन्हाळ्यात कपडे लवकर खराब होतात, त्यामुळे त्यांची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे.

– कपडे धुताना, सौम्य डिटर्जंट वापरा.

– कपडे उन्हात वाळवा, पण जास्त वेळ उन्हात ठेवू नका.

– कपडे इस्त्री करताना, हलके गरम इस्त्री वापरा.

टीप:

– तुमच्या आवडीनुसार आणि गरजेनुसार कपड्यांची निवड करा.

– उन्हाळ्यात जास्त घाम येत असल्यास, अतिरिक्त कपडे सोबत ठेवा.

– शरीराला पुरेसे पाणी मिळत आहे, याची काळजी घ्या

या टिप्सचा वापर करून, तुम्ही उन्हाळ्यात आरामदायक आणि थंड राहू शकता.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९





ज्योतिर्मय साहित्य


पूर्व जन्मीचे तिचे कोणते कर्म होते, हे वाल्मिकी रामायणात लिहिले नाही. पण दुसऱ्या संस्क्रुत रामायणात हे लिहिले आहे.एक जन्मात सीता एक राजकन्या होती. ती मैत्रिणी बरोबर खेळताना ती एक पक्षांची जोडी पाहते .त्यातील पक्षीनी गर्भवती होती. तिला उत्तम संस्कार होण्या साठी पक्षी रामायण ऐकवत होता. राम कथा चालू असताना सीतेने ही कथा पक्षाकडून ऐकली. या कथेने सीता प्रभावित झाली आणि संपूर्ण कथा रोज या पक्षांकडून ऐकावी या उद्देशाने सीतेने त्या पक्षांना पकडून पिंजऱ्यात ठेवले.पक्षी म्हणाला पक्षिनी गर्भवती आहे तिला पिंजऱ्यात ठेऊ नका. आम्ही रोज इथे येऊन तुम्हाला राम कथा ऐकवू. पण तेंव्हा सीतेने ते ऐकले नाही. नाईलाजाने पक्षी रोज रामायण ऐकवी पण त्यास ते पटेना. तो म्हणे या वेळी माझी पत्नी गर्भवती आहे. तिला मुक्त करा. मी कष्टाने मिळवलेले अन्न मला तिला खाऊ घालू द्या.माझ्या पिलांना कष्टाचे संस्कार होऊ द्या.यावर सीता म्हणाली की, मग मी तिला पिंजऱ्यात ठेवते व तुम्ही मोकळे रहा. चारा आणा.पक्षांचा नाइलाज होता.तो तिच्या साठी सीतेने दिलेला फुकटचा चारा न घेता आपला कष्टार्जीत चारा आणू लागला व रोज सीतेस राम कथा (त्या कल्पात घडलेल्या राम चरित्रातील) ऐकवू लागला. एके दिवशी चारा घेऊन येण्यास पक्षास उशीर होऊ लागला.पक्षिणीला हुर हूर वाटू लागली. चिंता वाढू लागली. ती म्हणे एकदा मला जाऊन पाहू द्या.सीता म्हणे मला काय वेडी समजता काय ? तुमचे इथून पळून जायचेआधीच ठरले असेल? मी सोडणार नाही. ती पिंजऱ्यात रडत बसली. रात्रभर ती वियोग करू लागली. पती आता येत नाही. प्राण त्याग करावा तर पोटात मुले. अंतिम क्षणी तो आला. ती मरण पावली पण मृत्यूपूर्वी पक्षिणीने सीतेला शाप दिला की, तू जसा मी गर्भवती असताना मला पती वियोग घडविला, तसे तुला तुझा पती वियोग घडवेल.तुला त्यागेल.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

**क्रमश**

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

भूपतीचा एक आतेभाऊ त्याच्याकडे शिक्षणासाठी येऊन राहिलेला असतो. त्याचे नाव अमल. हा अमल साधारणपणे चारुलतेच्या वयाचा असतो. त्याचे कॉलेजात शिक्षण सुरू असते. हा अमल तिला लिहिण्या वाचण्यात मदत करतो. तिला काही गोष्टी शिकवतो परंतु त्याची गुरुदक्षिणा म्हणून तिच्याकडून तो आपले लाड पुरवून घेतो. त्या दोघांमध्ये मैत्रीचे एक अनोखे नाते निर्माण होते. अमलने काही लिहिलेले तिला वाचून दाखवावे, तिने लिहिलेले त्याने वाचावे असे त्यांचे रोज सुरू होते. त्या दोघांचे एक वेगळे जग निर्माण झाले. या जगात त्या दोघांव्यतिरिक्त तिसऱ्या व्यक्तीला प्रवेश नव्हता.

भूपतीच्या घराच्या मागील बाजूस थोडीशी पडीक जमीन होती. या जमिनीवर एक करमळाच झाड होतं. या जमिनीवर आपण एक सुंदर बाग निर्माण करावी अशी स्वप्न चारुलता आणि अमल पाहत होते. त्यासाठी त्यांचं वेगवेगळं प्लॅनिंग सुरू असायच. त्या दोघांच्या त्या झाडाखाली बसून गप्पा सुरू असायच्या. आपण इथे सुंदर बाग निर्माण करून भूपतीला चकित करायचं असाही त्यांचा विचार होता.

नंतर काही कारणाने हा विचार बाजूला पडला आणि त्या दोघांनी आपल्या लेखनाचा एक अंक सुरू करायचा आणि त्यात लिहायचे असे ठरवले. अर्थात हा अंक काल्पनिकच होता. दोघेही एकमेकांना आपले लेखन वाचून दाखवत परंतु एकदा दोघांमधीलच असणारे हे लेखन अमलने बाहेर प्रसिद्ध करायला सुरूवात केली. त्याचबरोबर चारुलतेने लिहिलेले देखील त्याने बाहेर छापून आणले आणि त्या दोघांमध्ये जो अलिखित करार झाला होता तो मोडला. इथेच त्यांच्या संबंधातील पहिली ठिणगी पडली.

# अर्थज्ञानी महामानव

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

कोलंबिया विद्यापीठाने दिनांक ५ जून १९५२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पदवी बहाल करताना त्या मानपत्रातील मजकूर असा होता.. ‘‘भारतीय घटनेचे शिल्पकार, मंत्रिमंडळाचे सदस्य, भारतीय नागरिकांपैकी एक प्रमुख नागरिक, महान सुधारक, मानवी हक्काचा आधारस्तंभ व अर्थज्ञानी पुरुष‘‘ अशा उपाधीने त्यांना सन्मानित करण्यात आले. भारतीय रिझर्व बँकेची स्थापना १ एप्रिल १९३५ रोजी करण्यात आली. आज भारतीय रिझर्व बँकेचे कार्य व वैशिष्ट्य अधोरेखित आहे. याची जाणीव सदा आपणास होते.

भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वोच्च स्थानी असणारी ही वित्तीय संस्था स्थापन करण्याची मुख्य संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची होती. त्यावेळी त्यांनी एक शोध प्रबंध लिहिला होता त्याचं नाव होतं... ‘‘दि प्रॉब्लेम ऑफ रुपी : इट्स ओरिजिनल अँड इट्स सोल्युशन‘‘ या ग्रंथाच्या अहवालामध्ये रुपया त्याचबरोबर पौंड यांचा विनिमय दराचा प्रश्न सोडवण्यासाठी ब्रिटिशांनी एक आयोग स्थापन केला होता. आणि त्या आयोगामध्ये केन्स या ब्रिटिश अर्थतज्ञाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या शोध प्रबंधाचे आधार मानून..

अहवालानुसार चलन निर्मिती त्याचबरोबर किंमत पातळी स्थिर ठेवण्यासाठी रिझर्व बँकेची स्थापना करण्याच्या सूचना केल्या..

चलन पुरवठ्यासाठी सुवर्ण परिमाणच योग्य आहे असे सूचित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थ ज्ञान तोडीस तोड असल्याने सर्व जगभरात त्यांची एक जेष्ठ अर्थतज्ञ म्हणून ओळख झाली. आज जगामध्ये अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जी कर पद्धती लागू केलेली आहे. त्यामुळे जगभर खळबळ माजली आहे. अशाच प्रकारे त्याकाळी ब्रिटिशांनी अशीच कर पद्धती भारतावर लावलेली होती.

त्यामुळे ब्रिटिशांकडून भारतात आलेला माल कमी दराने आयात केला जायचा व वाटेल त्या दराने भारतामध्ये विकला जायचा. त्यामुळे सामान्य जनता लुटली जात असे. आणि त्याचे मुख्य माध्यम ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी होती. या कंपनीबद्दल डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ‘‘एडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया‘‘ कंपनी यावर अर्थशास्त्रीय प्रबंध लिहून प्रकाशित केला! यामुळे ईस्ट इंडिया कंपनीचे जगभर वाभाडे निघाले. व काळे धंदे लोकांच्या लक्षात यायला लागले. त्यामुळे कंपनीची जगभर बदनामी होत गेली. ब्रिटिश संसदेमध्ये सुद्धा यावर खलबते झाली. आणि एक प्रकारे भारतीय जनतेची ब्रिटिश कंपन्याकडून झालेली लूट कमी होऊ लागली. वित्तीय कर व सामाजिक न्यायव्यवस्था यांचा संगम घालून भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रबंध त्यांनी लिहून ठेवलेले आहे.




डॉ.डी.एस.काटे

त्यांचे अर्थ विचार भारतीय अर्थव्यवस्थेत न आल्याने आज रुपयाचे अवमूल्यन, अमर्याद सोनेसाठा, निर्याती पेक्षा वाढणारी आयात, काळा पैसा, चुकीचे कर धोरण, सामान्यांना अप्रत्यक्ष कराची पोहोचणारी झळ अशा अनेक समस्या सध्या आपल्या देशामध्ये जाणवत आहेत.

भारतीय अर्थतज्ज्ञांनी व सरकारी अर्थसल्लागारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा अभ्यास करून भारतातील चलन स्थिती व वित्तीय व्यवस्था यावर मंथन करून सुधारणा करणे अपेक्षित आहे. विशेषतः भारतात आज अर्थ विषमता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. श्रीमंत अधिकच श्रीमंत तर गरीब... गरीबच होऊ लागले आहेत. पैसा नसेल तर व्यक्ती, समाज व देश याच्या स्वातंत्र्याला काही महत्त्व नसून त्यासाठी अर्थ विषमता संपवणे हेच राष्ट्र उभारणीचे व विकासाचे मापक आहे असे त्यांनी त्यावेळेस आपल्या विचारातून व्यक्त केलेले आहे. त्याचीच प्रचिती सध्याला आपल्याला जाणवत आहे. अर्थ विचाराने आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक समस्याचे उकल करणारे महान अर्थतज्ञ म्हणून त्यांची कीर्ती निश्चितच जगभर आजही पसरत आहे..

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व वारसा पुढे नेल्यास भारत निश्चितच ज्ञानसंपन्न व अर्थसंपन्न देश म्हणून जगासमोर येईल. अशा या महामानवास विनम्र अभिवादन.

***



## जात्यावरच्या ओव्या......

---

**नातेसंबंध : बहिण-भाऊ**

वाट पाहू पाहू
कोपरा झिजला माडीचा
अजून येईना बाई
दादा बाराच्या गाडीचा ||३६||


वाटानं चालला
दादा गणेशा डुलतो
बघून बांधवाला
माझा कलीजा झुलतो ||३७||

---

संदर्भ : कै. गवणाबाई बोराडे
संकलन : सौ मनोरमा बोराडे

# उत्क्रांतीवादाचा जनक : चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज स्मृतिदिन. १९ एप्रिल १८८२ रोजी त्यांचे निधन झाले होते. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव



नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# उजेड वाटेची शिवार पेरणी करणारा कविता संग्रह

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

कवी ज्ञानेश्वर गायके यांचा पेरणी हा काव्यसंग्रह मिळाला. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदान योजनेतून अतिशय देखणी दखल घेतली. कवितेचा पेरा अन् अक्षय अक्षराची पेरणी ज्ञानेश्वर गायके यांनी केली आहे. मुखपृष्ठ सुभाष कुदळे यांचे आहे. ख्यातनाम साहित्यिक डॉ.वासुदेव मुलाटे सरांनी अतिशय आशय संपन्न ग्रामीण कवितेचा आजच्या वास्तवाचा धोंडोळा घेतं.

ही नवंकवीची पीढी सजकतेने लिहिती झाली आहे. जे बोचते टोचते ती सल अस्सल होऊन ही कविता खपली धरते आहे. असा एकूण समाजाभिमुख आशावाद कवी ज्ञानेश्वर गायके यांची पेरणी या काव्यात आहे. जसे,

‘‘आता वाढल्या बाभळी काळ्या भूईत रे जरी
नको करू खेद त्याचा वेळोवेळी सांगणारी
अशी भेटली माणसं वादळाशी भिडणारी
म्हणूनच सिध्द आता घेण्या गरूडभरारी ‘‘(शेवटची पिढी)

कविता ही सविनय उर्मीतून मुक्त व्यक्त होण्याचे एक रूदन आहे. त्याला शब्द स्नेहाचं रिंगण भारलेपण गवसलं की तो गवसणी घालू लागतो शब्दाला. हे वेल्हाळपण म्हणजे आत्मिक अंतरंगी कवितेशी नातं आहे.तो जसा या कृषीवल संस्कृतीचा पाईक आहे तसा तो साहित्य वाचनं संस्कृतीचा ही सेवक होऊन जातो आहे. वाड्या रस्त्यातून गावकुसातून साहित्य वेशीतून नव्या मुसंडीचं नवं बियाणे घेऊन ही सृजन समर्पक पेरणी करणारी कविता. मक्तेदारीचा मक्ता या सर्वहारा साहित्यिकांनी मोडीत काढला. एक नवा आयाम देण्याचं काम ही पेरणी करते आहे. कुठल्यास्या गावं कोपऱ्यात गल्ली बोळीच

ग्लोबल, ग्रेट ग्लॅमर आता कुणीही करू शकतो.पण

सच्चीईची शब्द अक्षरांचे लेणे करत पेरणी केली की, त्याची उगवण ही दिमाखदार होते. ते ज्ञानेश्वर गायके यांनी केली आहे. तिफण परीवाराचे अनंत उपकार कवी स्नेहाळू भावनेतून ऋणाई व्यक्त करतो. तिफणकार शिवाजी हुसे पाठराखण मध्ये लिहितात,‘‘कवी शब्दांची पेरणी करतांना

आपल्या अक्षर वाटेवर स्वतःची नाममुद्रा उमटून आहेत. तिफणच्या अक्षर पेरणीतील एक बी हजारो दान्याना प्रसवत आहे. तिफणच्या चाड्यावर शब्दांची मुठ धरून समाजात सद्विचारांची पेरणी करीत हा कवी निघाला आहे.‘‘ नितळ निर्लेप साधकाची पाठराखणं उभारी देते.

‘‘माझ्या कवितेनं जावं, रोज फिरण्या रानात
अन् वाऱ्याच्या कानात, सांगावं गुपित
तिनं होऊन रे गाथा, ज्ञानेश्वरीस भेटावं
इंद्रायणीत बुडून, कुणब्यास जगवावं‘‘
(माझ्या कवितेनं)

**पुस्तक परीक्षण**


डॉ प्रभाकर शेळके, जालना
९९७५१३७३३७

कविता ही कवीची ओळख व्हावी. तशी पेरणी ही शिवर माथ्याची शब्द शेरणी आहे. मराठवाड्याच्या मातीचा मृदगंध घेऊन येणारी ही कविता हिरव्या फांदीला गच्च बिलगुन शब्द शिवार येतं. रानशिवराचा हळवा गारवा देऊन जाते.या कवितेने आजच्या ग्रामीण वास्तवाचे प्रखर चिंतन मांडले आहे. आज मायमातीची नाळ तुटते आहे.दावणीची बैलं गेली. पेरणी ही यंत्रवत झाली. बांधावरच्या गच्चपटात कव्हानचं मळणी झाली.सोयबीनची पोती मोंढ्या मधी गेली. गावगाड्याचं माल मातीचं मातेर होऊन गेलं. खळगुटी जगणं वाट्याला आलं. ही ठणक कवी व्यक्त करतो. सारचं नी सगळंच धस्कटं उमदळून आलं ही कविता हे धस्कटं तनकट उपटून फेकण्याची ही धमक दाखवते आहे. ही कविता त्या वेदनेनाचा रुमणपेच घेऊन येते. पेरणी केलीच पाहिजे. मायभूईची ओटी भरलीचं पाहिजे. ही कुणब्यांची

कविता जगण्याचा शिनवटा घालते. जसे,

‘‘आज करू या पेरणी, आला पाऊस हो छान.
बळीराजा बाप माझा,जमा करीतो बियान.
नका तुडवू रे रान,बाप विनवणी करे
केली आताचं पेरणी,कोंब वर येऊ द्या रे‘‘(पेरणी)

कष्टवंत बापाची आर्त हाक मनाला पिळवटून टाकते. ही बळीवंताच्या सर्वव्यापक वेदनेची तीव्रता करून देणारी





कविता असल्याने आजच्या ग्रामीण गावं बदलतांना कवी म्हणून ‘‘बळीराजा बाप आमचा राब राब राबतांना
अस्मानी संकटाशी सदा एकटा झुंजताना...
पोशिंदा तो जगाचा उपाशीच राहतांना
कर्जाला कंटाळून शेवटी जग आपले सोडतांना‘‘. (गावं बदलतांना) ही कविता वास्तवाचे खनपुट मनाला टोचणी करून देते. कवी ज्ञानेश्वर गायके यांची पेरणी एक दानेदार शब्द अक्षरांची पेरणी करणारी आहे. ग्रामीण बोलीशैलीचा

वापर कमी असलातरी ती सुसंस्कृत विचारांची पेरणी करते.

कुठे ही अवजड बोजड शब्दांचा मोह नाही. अतिशय नितळ निर्लेप साधकाची ही कविता संयत मनोभूमिकेतून येते. या कवितेने नाती गोती आई बाबां गावं शिवाराचं नातं गुंफल्याचं गुणगान केले आहे.शिवार माथा उन्नत करतं ती.

‘‘माय संस्कार शिदोरी, माय माझी रे माऊली.
माय उन्हात तापली, देण्या लेकास सावली.
माय खरं विद्यापीठ, माझ्यासाठी चारीवेद.
माय ओळख जी माझी, गोड तुझा आशीर्वाद‘‘.(माय माझी)

तसं गाव शिवाराच्या मायमातीत रांगलो, खेळला तीचे ही ऋण उल्लेख या कवितेने केला आहे.या मायबोली मळा मळणी,खळदळ, मातीचा लळा जीवाचा जिवडा होऊन जाताना,‘‘या मातीने देता भाकर,
जगण्या येथे लायक झालो.
तिफण घेऊनी बीज पेरता
जग पोशिंदा राजा झालो‘‘(या मातीने)

ही सद् विवेकी भावनेची पेरणी करीत ही कविता निघाली आहे. अस्सल गाव शिवाराचं गाणं मुक्त कंठाने गातं हे गावाचं पाखरु शब्दपंख लावून गावं शिवार कवेत घेऊन मुक्त पेरणी करीत ही सविनय कविता आशयघन अंगाने जाणारी आहे.

‘‘साला मागून साल रे साल वनवास नित्य भाळी
कधी कोरडा दुष्काळ अन् कधी अवकाळी
जीव मातीत पेरतो इथं शेतकरी रोज
अनमोल जिंदगाणी त्याची मातीमोल आज‘‘(बोंड अळी) ही बळीवंताची वेदना कायमचं शेतीमातीशी घरोबा करून असल्याने शेतकऱ्यांचे हाल हे हलाहल प्राशन करून जगणचं वाट्याला आलं. असे प्रश्न मुखर करीत विवर दाखवणारी ही कविता उद्याचं भविष्य भाकित करते. कविता ही नेहमीच काळाचा अक्षर ईळा घेऊन विचारांची कणीस कापणी करते. कविता ही उजेड वाटेची खातरजमा करून पेरणी करते.कवी ज्ञानेश्वर गायके यांच्या सार्थ काव्य वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना

काव्यसंग्रह:-पेरणी -कवी ज्ञानेश्वर गायके, कन्नड
अनघा प्रकाशन, ठाणे (पुर्व)
मुखपृष्ठ:-श्री. सुभाष कुदळे
प्रथमावृती:-१३ जानेवारी २०२५
किंमत:-४८ रूपये
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ अनुदान

***

# सब तीरथ बार बार.. गंगा सागर एक बार.... प्रवासातील थरार!

**ज्योतिर्मय साहित्य**

सेवेत असतांना कधीही पर्यटनाचा आनंद घेता आला नाही. शनिवारी रात्री जाऊन सोमवारी सकाळी परत ड्यूटीवर असे. पण सेवा निवृती काळात भारत भ्रमण करण्याचे बरेच बेत पुर्ण झाले. तीर्थक्षेत्रा बरोबरच नयन रम्य नैसर्गिक ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा मनसोक्त आनंद सध्या घेत आहे !जानेवारी २०१८ मध्ये माझे परम स्नेही मित्रवर्य श्री. अनिलराव जोशी यांनी गंगासागरचा बेत नियोजित केला त्या प्रमाणे श्री.दिलीप कान्हेगांवकर, स्व.दिलीप मोकाटे, पळसकर सपत्निक व श्रीमती देशमुखताई व आम्ही नियोजना प्रमाणे १० जानेवारी २०१८ रोजी पहाटे २-३० वाजता नाशीकवरुन भुवनेश्वर एक्स्प्रेसने निघालो. भुवनेश्वर, जगन्नाथ पुरी येथिल भगवान जगन्नाथ दर्शन करुन कोणार्क सुर्यमंदिर पाहिले. मकर संक्रातीच्या शुभमुहूर्तावर डायमंड हार्बर या कलकत्त्याच्या उपनगरात पहाटे पोंहचलोत. टूर मॅनेजर त्वरीत गंगासागरला जाण्याची वारंवार विनंती करत होता. पण १९-२० तासाच्या प्रवासा मूळे सर्वांना भुके बरोबरच थोड्या विश्रांतीची गरज होती.... पण टूर मॅनेजर म्हणाला की, तुम्ही लवकर गेलात तर परतीची शाश्वती आहे. परत तुम्ही बरोबर जास्त पैसे, किंमती वस्तू , मोबाईल घेऊन जाणे टाळा. कारण तेथे भयंकर गर्दी असते ! त्याप्रमाणे मोजकेच पैसे व मोबाईल व किंमती वस्तू सोबत घेतल्या नाहीत. पण मी सपर्क असावा म्हणून माझा एक मोबाईल सोबत घेतला होता.

बरोबर वेळ केलेस अडथळे येतील! पण कोणी ही ऐकण्याच्या स्थितीत नव्हते. स्नान व पुरेसा नाष्टा केला. व सकाळी दहाच्या दरम्यान डायमंड हार्बर वरुन गंगासागरला निघालोत खाजगी जीपने येथे व नंतर टमटमने जेटी पर्यंत चार वाजता गेलोत तासभर बोटीने प्रवास करुन गंगासागरच्या किनाऱ्यावर गेलो होतो.

तेथून खाजगी वाहनाने कपिल ऋषीच्या मंदिरा पर्यंत गेलो होतो. सर्वत्र गुडघाभर पाणी होते. गंगासागर तेथे पोंहचताच श्री.मोकाटे व कान्हेगांवकर यांना मोबाईल वर कॉल केला. ४-५ वेळा संपर्क साधून ही त्यांनी कॉल घेतला नाही. दर्शन घेऊन परतीच्या मार्गावर निघालो.

बसस्टॉपवर प्रचंड गर्दी व कोणत्याही प्रकारची शासकीय यंत्रणा उपलब्ध नव्हती. दुपारी जेटीची गॅलरी तुटून बरेच यात्रेकरु बळी पडले. ही बातमी टिव्ही वर वारंवार देत होते. रात्रीचे आठ वाजले होते. तेवढ्यात संध्या मोकाटे वहिनी मिस झाल्या. व त्यांना शोधण्यासाठी दोन ग्रुप केले होते. पण थोड्याच वेळात श्री.मोकाटे यांनी माझ्या फोनवर संपर्क केला की, संध्या पोलीस स्टेशनला आहे व ती सुरक्षित आहे. तेंव्हा आमची मन:स्थिती ठिक झाली.... व महामंडळा सब तीरथ बार बार गंगा सागर एक बार.... प्रवासातील थरार !

**प्रवास वर्णन**
**श्याम वा. कुलकर्णी, पुणे**
**मो. 98238 09656**



सेवेत असतांना कधीही पर्यटनाचा आनंद घेतला नाही. शनिवारी रात्री जाऊन सोमवारी सकाळी परत ड्यूटीवर असे. पण सेवा निवृती काळात भारत भ्रमणकरण्याचे बरेच बेत पुर्ण झाले. तीर्थक्षेत्रा बरोबरच

नयन रम्य नैसर्गिक ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा मनसोक्त आनंद घेत आहे!

जानेवारी २०१८ मध्ये माझे परमस्नेही मित्रवर्य श्री. अनिलराव जोशी यांनी गंगासागरचा बेत नियोजित केला त्या प्रमाणे श्री.दिलीप कान्हेगांवकर,स्व.दिलीप मोकाटे, पळसकर सपत्निक व श्रीमती देशमुखताई व आम्ही.नियोजना प्रमाणे १० जानेवारी २०१८ रोजी

पहाटे २-३० वाजता नासिक वरुन भुवनेश्वर एक्स्प्रेसने निघालो.भुवनेश्वर,जगन्नाथ पुरी येथिल भगवान जगन्नाथ

दर्शन करुन कोणार्क सुर्यमंदिर पाहिले. मकर संक्रातीच्या शुभमुहूर्तावर डायमंड हार्बर या कलकत्त्याच्या उपनगरात पहाटे पोंहचलोत. टूर मॅनेजर त्वरीत गंगासागर ला जाण्याची वारंवार विनंती करत होता. पण १९-२० तासाच्या प्रवासा मूळे सर्वांना भुके बरोबरच थोड्या विश्रांतीची गरज होती.... पण टूर मॅनेजर म्हणाला की, तुम्ही लवकर गेलात तर परतीची शाश्वती आहे. परत तुम्ही बरोबर जास्त पैसे, किंमती वस्तू , मोबाईल घेऊन जाणे टाळा. कारण तेथे भयंकर गर्दी असते! त्याप्रमाणे मोजकेच पैसे व मोबाईल व किंमती वस्तू सोबत घेतल्या नाहीत. पण मी सपर्क असावा म्हणून माझा एक मोबाईल सोबत घेतला होता.

बरोबर वेळ केलेस अडथळे येतील! पण कोणी ही ऐकण्याच्या स्थितीत नव्हते. स्नान व पुरेसा नाष्टा केला. व सकाळी दहाच्या दरम्यान डायमंड हार्बर वरुन गंगासागरला निघालोत खाजगी जीपने येथे व नंतर टमटमने जेटी पर्यंत चार वाजता गेलोत तासभर बोटी ने प्रवास करुन



गंगासागरच्या किनाऱ्यावर गेले होतो.

तेथून खाजगी वाहनाने कपिल ऋषीच्या मंदिरा पर्यंत गेलो होतो. सर्वत्र गुडघाभर पाणी होते. गंगासागर तेथे पोंहचताच श्री.मोकाटे व कान्हेगांवकर यांना मोबाईलवर कॉल केला. ४-५ वेळा संपर्क साधून ही त्यांनी कॉल घेतला नाही. दर्शन घेऊन परतीच्या मार्गावर निघालो.

बसस्टॉपवर प्रचंड गर्दी व कोणत्या ही प्रकारची शासकीय यंत्रणा उपलब्ध नव्हती. दुपारी जेटीची गॅलरी तुटून बरेच यात्रेकरु बळी पडले. ही बातमी टिव्ही वर वारंवार देत होते. तेवढ्यात संध्या मोकाटे वहिनी मिस झाल्या. व त्यांना शोधण्यासाठी दोन ग्रुप केले होते. पण थोड्याच वेळात श्री.मोकाटे यांनी माझ्या फोनवर संपर्क केला की, संध्या पोलीस स्टेशनला आहे व ती सुरक्षित आहे. तेंव्हा आमची मन:स्थिती ठिक झाली..अंतरासाठी १००/प्रती व्यक्ती दिले.

पण कंडक्टरने तिकीट ही दिले नव्हते. अंधा कानूनच..

इच्छीत स्थळी रात्री ११ वाजता पोहोचणार.

पुढे १० कि.मी. अंधारात व आड रानाने जेटी पर्यंत पायपिट करावी लागणार होती

रात्रभर अंधारात व गर्दीत ना हॉटेल ना पाण्याची व्यवस्था, ना पोलीसांची मदत कार्य..

आशा स्थितीत दुपरच्या ३ वाजता जेटीवर पोंहचलोत.

गर्दीत आमचे ३-४ ग्रुप मध्ये ताटातूट झाली होती. जेटीवर चेंगराचेंगरीत कांही यात्रेकरु दगावले. मी व पत्नी सोबत दूर्गादासराव महाराज पळसकर होते. त्यांना कमी ऐकायला येते. त्यामुळे हातामध्ये हात पकडून बोटी पर्यंत जातांना त्याना भोवळ आली होती. एका व्यक्तीकडून पाणी घेऊन त्यांच्या चेहऱ्यावर पाणी शींपडल्याने ते पुर्वत झाले. व बोटीने लॉट १ वर पोहचून बसने डायमंड हार्बरच्या लॉजवर रात्री ८-३० वाजता पोंहचलोत.

आमच्या पुर्वी पंधरा मिनीट संध्या वहिनी व मंजू वहिनी पोंहचल्या होत्या. व रात्री आकरा वाजता अनिलराव जोशी, जोशी वहिनी, सरोजताई, देशमुख बाई आले व सर्व वातावरण आनंदी झाले.

अनिलराव हळवे, मित्रांना अश्रू आनावर झाले होते. बराच वेळ ते रडत होते... त्यामुळे आजही त्या प्रवासाचा थरार वेदनादायक आठवणी मनात घर करुन बसलेल्या आहेत.... व आठवतो तो सब तिरथ बार बार गंगा सागर एक बार....

# साहित्य हेच जीवनमूल्य-प्रकाश मुकुंद

## स. भु. पत्रिकेच्या सुटी विशेषांकाचे थाटात प्रकाशन

**ज्योतिर्मय सराहित्य**
**छत्रपती संभाजीनगर**

– साहित्य हेच जीवनमूल्य आहे. साहित्यामुळे कल्पनांचे उत्तम भरणपोषण होऊन जीवनाला अर्थपूर्णता लाभते. सर्जनशील अभिव्यक्तीसाठी मातृभाषेतून शिक्षणाला पर्याय नाही. मातृभाषेतूनच विविध संकल्पना अधिक नेटक्या होतात, असे प्रतिपादन विभागीय शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकुंद यांनी केले. स.भु. शिक्षण संस्थेच्या स.भु. पत्रिकेच्या सुटी विशेषांकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते.

गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी सभागृहात बुधवारी पार पडलेल्या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी स.भु. संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, तर सुप्रसिद्ध कवी डॉ. दासू वैद्य, स.भु.चे ज्येष्ठ सदस्य



ज्ञानप्रकाश मोदाणी यांची उपस्थिती होती.

मुकुंद पुढे म्हणाले की, भारतीय तसेच बाहेरच्या देशातील अनेक विचारवंतांनी मातृभाषेतूनच शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. विद्यार्थ्यांच्या संकल्पना मातृभाषेतूनच स्पष्ट झाल्या पाहिजेत. मात्र आज शिक्षण व्यवस्थेमध्ये करिअरवर जास्त लक्ष दिले जात आहे, ही शोकांतिका आहे.

प्रसिध्द कवी डॉ. दासू वैद्य म्हणाले की, वाचनामुळेच आपली मुळे अधिक घट्ट होतात. आजच्या काळात मुलांना व्यक्त होण्याची आवश्यकता आहे. आपण वाचन प्रक्रियेपासून दुरावत गेलो तर भविष्यात त्याची मोठी किंमत मोजावी लागेल, असे स्पष्ट करून स.भु. शिक्षण संस्था स.भु. पत्रिका सुटी विशेषांकाच्या माध्यमातून वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी करत असलेल्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले.

प्रास्ताविकात स.भु. पत्रिकेचे कार्यकारी संपादक मनोज तुळपुळे यांनी अंकाची वैशिष्ट्ये नमूद केली. अध्यक्षीय समारोपात स.भु.चे सरचिटणीस डॉ.श्रीरंग देशपांडे यांनी वाचन संस्कृती वाढविण्याचे काम शिक्षणसंस्थांचे आहे असे नमूद करून याकामी स.भु. नेहमीच पुढाकार घेईल अशी ग्वाही त्यांनी दिली. पाहुण्यांचा परिचय कपिल देहेकर, सूत्रसंचालन प्रा.पंजाबराव मोरे यांनी, तर स्मिता चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास स.भु. च्या सहचिटणीस डॉ. रश्मी बोरीकर, सदस्या डॉ. साधना शाह, शहरातील नागरिक, संस्थेच्या शाळा-महाविद्यालयांचे प्राचार्य/ मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शशिकांत धोत्रे दिग्दर्शित सजना चित्रपटाचं धमाल गाणं ``बुंगा फाईट`` सर्वत्र धुमाकूळ घालतंय

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी गाण्यांनी सध्या सोशल मीडियावर एक चांगला ट्रेंड सेट केलाय. सर्वत्र मराठी गाणी वाजताय आणि गाजताय सुद्धा. अशातच आणखी एका मराठी गाण्याने सोशल मीडियावर चांगलाच धुमाकूळ घातलाय. शशिकांत धोत्रे दिग्दर्शित सजना चित्रपटाचं धमाल गाणं ``बुंगा फाईट`` हे मराठी गाणंही आता रसिकांच्या पसंतीस उतरतंय. त्यामुळे सोशल मीडियावर सध्या याच गाण्याची चर्चा सुरु आहे.

सजना चित्रपटातला ``बुंगा फाईट`` हे गाणं एक पॉप्युलर डान्स नंबर ठरत आहे ह्यात काही शंका नाही. प्रेक्षक आत्ताच ह्या गाण्यावर थिरकायला लागली आहेत. अनेक कार्यक्रमांमध्ये हे गाणं वाजतय, प्रेक्षक डान्स करताना दिसत आहेत. अशातच आता प्रेक्षकांना हे गाणं लाईव्ह सुद्धा ऐकायला मिळालं. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे ह्यांनी हे गाणं गायलं आहे आणि नुकतच त्यांनी प्रेक्षकांचं लाईव्ह मनोरंजन केलं आणि त्यांना प्रचंड चांगला प्रतिसाद मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आपल्या चाहत्यांसाठी त्यांनी वेग वेगळ्या ठिकाणी परफॉर्म केलं. सजना सिनेमातील ``बुंगा फाईट`` हे गाणं नक्कीच प्रेक्षकांना वेड लावत आहे हे आनंद शिंदे ह्यांनी



पटवून दिलय. इतकच नव्हे तर ह्या गाण्यानी २.५ मिलियन व्युजचा आकडा पार केलाय.

गावरान भाषा आणि लोकसंगीताची छाप या गाण्यात पहायला मिळते. ``बुंगा फाईट`` या गाण्याला ओंकारस्वरूप ह्यांनी संगीत दिलं आहे. तर सुहास मुंडे यांचे शब्द आहेत. सजना चित्रपटाची निर्मिती स्वतः शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे. सजना २३ मे २०२५ ला आपल्या जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

# चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव, स्व.राज कपूर जीवन गौरव आणि गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कारांची घोषणा

## महेश मांजरेकर, अनुपम खेर, काजोल देवगण, मुक्ता बर्वे व भीमराव पांचाळे यांचा सन्मान

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या मानाच्या चित्रपट पुरस्कारांची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड.आशिष शेलार यांनी केली. यामध्ये चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्कार, चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार, स्व.राज कपूर जीवन गौरव पुरस्कार, स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार तसेच गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार अशा पाच महत्त्वाच्या पुरस्कारांची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड.शेलार यांनी मंत्रालयात झालेल्या पत्रकार परिषदेत केली.

मराठी चित्रपट क्षेत्राच्या उत्कर्षाकरिता ज्यांनी दीर्घकाळ आपले आयुष्य व्यतीत केले आहे तसेच चित्रपटसृष्टीत अभिनय, संगीत, निर्मिती, दिग्दर्शन क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली आहे, अशा मान्यवरास चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. तसेच या क्षेत्रात विशेष उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरास चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षीचा चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्कार नामवंत अभिनेता, दिग्दर्शक व निर्माते महेश मांजरेकर यांना जाहीर झाला आहे. या पुरस्कारांर्गत रु.१० लाख रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक दिले जाईल. चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार यंदा प्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना प्रदान करण्यात येणार असून, या पुरस्काराचे स्वरूप रु. ६ लाख, स्मृतीचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक असे आहे.

हिंदी चित्रपट क्षेत्राच्या उत्कर्षाकरिता ज्यांनी दीर्घकाळ आपले आयुष्य व्यतीत केले आहे तसेच चित्रपटसृष्टीत अभिनय, संगीत, निर्मिती, दिग्दर्शन क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली आहे, अशा मान्यवरास स्व.राज कपूर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. हिंदी चित्रपट सृष्टीतील मानाचा स्व. राज कपूर जीवन गौरव पुरस्कार प्रख्यात अभिनेते अनुपम खेर यांना देण्यात येणार आहे. तर स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार यंदा अष्टपैलू अभिनेत्री काजोल देवगण यांना घोषित झाला आहे. या दोन्ही पुरस्कारांचे अनुक्रमे रु. १० लाख व रु. ६ लाख, स्मृतिचिन्ह व मानपत्र, चांदीचे पदक असे स्वरूप आहे.

तसेच, संगीत क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या जेष्ठ कलाकारास गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार देण्यात येतो. १९९३ पासून देण्यात येणारा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार यावर्षी मराठीतील ज्येष्ठ गझलगायक भीमराव पांचाळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. रु. १० लाख रोख रक्कम, मानचिन्ह, मानपत्र व शाल असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार्थीची निवड करण्याकरिता शासन स्तरावर समितीचे गठन करण्यात आले होते. या समितीचे अध्यक्ष सांस्कृतिक कार्य मंत्री असून यामध्ये पाच अशासकीय सदस्य आहेत. पं ब्रिजनारायण, अशोक पत्की. सत्यशील देशपांडे, पं उल्हास कशाळकर आणि अंबरीश मिश्र यांचा या समितीमध्ये समावेश होता. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव या समितीचे सदस्य असून सांस्कृतिक कार्य संचालक या समितीचे सदस्य सचिव आहेत.

सर्व पुरस्कारांचे वितरण २५ एप्रिल, २०२५ रोजी एन.एस.सी.आय. डोम, मुंबई येथे एका भव्य समारंभात होणार आहे.

या सोहळ्याशिवाय, संविधान अमृत महोत्सव आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभागातर्फे २० एप्रिल, २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथे एक खास सांगितिक मानवंदना कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक सुरेश वाडकर,




आदर्श शिंदे, वैशाली सामंत, उर्मिला धनगर, नंदेश उमप आदी कलाकार सहभागी होणार असून, संचालन सुबोध भावे करणार आहेत. कार्यक्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीतं, नाट्यप्रवेश व नृत्य सादर केले जातील. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, सन्मानिका प्रवेशपत्रे शिवाजी नाट्य मंदिर व रवींद्र नाट्य मंदिर येथे 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर वितरित केली जातील, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड. शेलार यांनी या पत्रकार परिषदेत दिली.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559